Annexure I - 1


# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
# राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी - ०२२ - २२७१७५०० आरोग्य भवन, ३रा मजला,
फॅक्स - ०२२ - २२६७४२९.५५ सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१


**परिपत्रक** जा.क्र.राआसो/मनुष्यबळ कक्ष/ सुधारित पदभरती समिती/ १०२६६-१०६०० /२०२३

दिनांक -२६.०४.२०२३

**विषय - राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत पदभरतीसाठी विविध स्तरावरील सुधारित समिती गठीत करणेबाबत.**

**संदर्भ -** १. सन २०२२-२३ मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा.

२.या कार्यालयाचे पत्र क्र.राआसो/मनुष्यबळ/समिती-गठन/७४९३४-७५१७७/१८ दि.०५.१२.२०१८ रोजीचे पत्र

३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. राआसो/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती समिती/१६५४५०-७४६/२०२२ दिनांक- २४.११.२०२२

४.जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय अहमदनगर,यांचे पत्र क्र.एन.एच.एम/ डीपीएमएय/भरती बाबत मार्गदर्शन/२०८/२३ दि.१७/०३/२०२३

५. या कार्यालयाची मंजुर टिपणी.

**प्रस्तावना-**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रतिवर्षी मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा केंद्र शासनामार्फत मंजुर करण्यात येतो. सदर आराखड्यामध्ये कंत्राटी तत्वावरील विविध आरोग्य कार्यक्रमांतर्गत पदे मंजूर करण्यात येतात. त्यानुसार मंजूर पदांच्या अधिन राहून विविध स्तरावर पदभरती प्रक्रिया राबविण्यात येते. संदर्भ क्र.२ च्या पत्रानुसार जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली एकाच समितीद्वारे पदभरती करण्यात येत होती. तथापि, संदर्भ क्र.३ नुसार तयार करण्यात आलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पदभरती प्रक्रीयेसाठी जिल्हास्तरावरील जिल्हा शल्य चिकित्सक अधिनिस्त पदे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी अधिनिस्त पदे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली भरण्यात येत आहेत. परंतु, एकाच जिल्ह्यामध्ये दोन पदभरती समिती असून सदरील समित्यांमार्फत पदभरती करतांना स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या अडचणी निर्माण होत आहेत. त्यामध्ये मुख्यते करून बिंदुनामावली बनविताना विविध अडचणी उद्भवत असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत संदर्भ क्र.४ अन्वये अहमदनगर जिल्ह्याने पूर्वीप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली एकच समिती पुनर्गठीत करून पदभरती करणे बाबत परवानगी मागितली आहे. तसेच इतर जिल्ह्यांमार्फत देखील भ्रमणध्वनी द्वारे विचारणा होत आहे. त्यानुसार सदर समिती मध्ये बदल करण्याची बाब या कार्यालयाच्या विचाराधीन होती.

निर्णय-

प्रस्तावनेत नमूद कारणांचा साधकबाधक विचार करून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा आरोग्य सोसायटीचे अध्यक्ष असल्यामुळे दोन समितीऐवजी एकाच समितीमार्फत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पदभरती प्रक्रिया करण्याबाबत या निर्णयाद्वारे खालीलप्रमाणे समित्या सुधारित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | जिल्हा स्तरावरील पदभरती समिती |
|---|---|
| १. | अध्यक्ष - मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २. | सदस्य - जिल्हा शल्य चिकित्सक |
| ३. | सदस्य सचिव- जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ४. | सदस्य - माता व बाल संगोपन अधिकारी |
| ५. | सदस्य - जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक |
| ६. | सदस्य - संबंधित कार्यक्रमाचे प्रतिनिधी / विषय तज्ञ |

| अ.क्र | महानगरपालिका स्तरावरील पदभरती समिती | नगरपालिका स्तरावरील पदभरती समिती | परिमंडळ स्तरावरील पदभरती समिती |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष- आयुक्त , महानगरपालिका | अध्यक्ष- मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष- उपसंचालक परिमंडळ |
| २. | सदस्य सचिव - वैद्यकीय आरोग्य अधिकारी | सदस्य सचिव- तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य सचिव- परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक |
| ३. | सदस्य - माता व बाल संगोपन अधिकारी | सदस्य - जिल्हा प्रशासकीय अधिकारी (नगरपालिका), जिल्हाधिकारी कार्यालय | सदस्य- प्राचार्य आरोग्य कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र/राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था नागपूर |
| ४. | सदस्य - शहर कार्यक्रम व्यवस्थापक | सदस्य- मुख्याधिकारी (न.पा.) | सदस्य - सहाय्यक संचालक |
| ५. | सदस्य- संबंधित कार्यक्रमाचे प्रतिनिधी/ विषय तज्ञ | सदस्य - जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक | सदस्य -संबंधित कार्यक्रमाचे प्रतिनिधी / विषय तज्ञ |

अभियानांतर्गत मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्याच्या अधिन राहून विविध आरोग्य कार्यक्रमांची कंत्राटी पदभरती व बाह्यस्त्रोत यंत्रणेव्दारे भरावयाची पदे/ सेवा, ऑन कॉल तत्वावरील पदे इ. उपरोक्त तक्त्यात नमुद समितीव्दारेच भरण्यात यावी. तसेच अभियानांतर्गत रिक्त होणा-या पदांची पदभरती ही अविरतपणे सुरु ठेवण्यात यावी.

धीरज कुमार (भा.प्र.से)
आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक
राष्ट्रीय आरोग्य अभियान,
महाराष्ट्र, मुंबई

प्रति,

१) जिल्हाधिकारी, (सर्व)

२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कु.क.) पुणे
६) सहसंचालक, आरोग्य सेवा (राअंनिका/असंसर्गजन्य रोग), मुंबई
७) सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे
८) सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे
९) संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर
१०) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ), पुणे
११) उपसंचालक , आरोग्य सेवा (परिवहन), पुणे.
१२) उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रुषा), पुणे
१३) उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व),
१४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१५) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, (सर्व)
१६) प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व)
१७) सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (एकात्मिक साथरोग सर्वेक्षण प्रकल्प, पुणे)
१८) कार्यकारी संचालक, राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे.

**प्रत कार्यवाहीस्तव-**

१. परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व)
२. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक/ जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा परिषद, (सर्व)
३. शहर कार्यक्रम व्यवस्थापक/ शहर लेखा व्यवस्थापक, महानगरपालिका (सर्व)

**प्रत माहितीस्तव -**

१. संचालक, आरोग्य सेवा मुंबई/पुणे,
२. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
४. अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
६. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
७. सहाय्यक संचालक (एनयुएचएम), राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
८. सहाय्यक संचालक (आयुष), राष्ट्रीय आयुष अभियान, मुंबई
९. सहाय्यक संचालक (रक्तकक्ष), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
१०. राज्य कार्यक्रम व्यवस्थापक, (एनएचएम/एनयुएचएम), राआसो, मुंबई
११. कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई (सर्व)

**प्रत माहितीस्तव सविनय सादर-**

१. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

Annexure I-2

आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ६१९००१-६१२२२४

परिपत्रक

जा.क्र.राआसो/मनुष्यबळ/वयोमर्यादा/ /१८
दि.२९/०९/२०१८

**विषयः राष्ट्रीय आरोग्य अभियान व राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानामध्ये सर्व स्तरावर भरण्यात येणाऱ्या पदांच्या वयोमर्यादेबाबत.**

**संदर्भः** मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई यांची दिनांक २७ सप्टेंबर २०१८ रोजीची मान्य टिपणी.

राष्ट्रीय आरोग्य अभियान व राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानामध्ये राज्यस्तर, परिमंडळस्तर व जिल्हास्तरावर विविध कार्यक्रमांतर्गत कंत्राटी पदावर ११ महिन्यांच्या कालावधीकरीता नेमणूका करण्यात येत असतात. विविध कार्यक्रमांच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाकडून प्राप्त होत असून त्यामध्ये नियुक्तीच्या अनुषंगाने वेगवेगळया वयोमर्यादा आढळून येतात. संदर्भात अभियानाच्या विविध कार्यक्रमांतर्गत पदभरती करतांना वयोमर्यादेमध्ये एकसूत्रिपणा आणणेचा प्रस्ताव विचाराधीन होता. अनुषंगाने उक्त संदर्भानुसार वयोमर्यादेबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वैदयकिय अधिकारी (MBBS),विषेशज्ञ, अतिविषेशज्ञ पदावरील उमेदवार उपलब्ध होत नसल्याने सदर पदांसाठी सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा ६१ वर्ष अशी व सेवा समाप्तीची मर्यादा ७० वर्ष ठेवण्यात यावी.

२) अभियान अंतर्गत इतर रुग्ण सेवेशी संबंधीत पदे उदाहरण परिचारीका, अधिपरिचारीका, तंत्रज्ञ,समुपदेशक, औषध निर्माता इत्यादी पदे भरतीसाठी कमाल वयोमर्यादा ५९ वर्ष व समाप्ती वयोमर्यादा ६५ वर्ष अशी ठेवावी.

३) उर्वरीत सर्व पदांसाठी सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ व राखीव प्रवर्गासाठी ४३ अशी ठेवण्यात यावी. तसेच या पदासाठी सेवा समाप्ती मर्यादा ६० वर्ष ठेवण्यात यावी. उक्त नमुद पदांवर (मुदद क्र. ३ मधील) राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरीता कमाल सेवा प्रवेश मर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात यावी.

४)६० वर्षावरील अर्जदारांकरिता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरीक योग्यता (Physical Fitness) चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. शासकीय कर्मचारी यांच्यावर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

उपरोक्त मार्गदर्शक सूचना राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत सर्व कार्यक्रमांतर्गत पदभरती करतांना काटेकोरपणे अनुसरण्यात याव्यात. सदरहु मार्गदर्शक सुचना हया निर्गमीत झालेल्या दिनांकापासून लागू राहतील.

आयुक्त आरोग्य सेवा तथा संचालक
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

प्रति,

१. आयुक्त महानगरपालिका (सर्व)
२. व्यवस्थापकीय संचालक (सिडको), नवी मुंबई
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. अतिरिक्त संचालक (कु.क.) आरोग्य सेवा, राज्य कुंटूब कल्याण कार्यालय,पुणे
५. मुख्याधिकारी नगरपालीका (एनयुएचएम अतंर्गत)
६. मुख्याधिकारी कटकमंडळे (एनयुएचएम अतंर्गत), देवलाळी,पूणे, खडकी, देहूरोड.
७. सहसंचालक, कुष्ठरोग व क्षयरोग, पुणे
८. सहसंचालक (असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
९. सहसंचालक हिवताप व हत्तीरोग, जलजन्यरोग,पुणे
१०.उपसंचालक (आईसी), पुणे
११.उपसंचालक (तंबाखू नियंत्रण कार्यक्रम) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
१२.उपसंचालक (आमाजीआ), पुणे
१३. उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व)
१४. कार्यकारी संचालक , राज्य आरोग्य संसाधन यंत्रणा, पूणे
१५. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परीषद (सर्व)
१६. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, (सर्व)
१७. प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर
१८. प्राचार्य, आरोग्य व कुंटुब कल्याण प्रशिक्षण संस्था (सर्व)

प्रतः

१. परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, उपसंचालक आरोग्य सेवा, (सर्व)
२. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा परीषद (सर्व)
३. जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा परीषद (सर्व)
४. शहर कार्यक्रम व्यवस्थापक, महानगरपालीका (सर्व)

प्रत सविनय सादरः

- मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

Annexure I- 3

# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१

**शुध्दीपत्रक**

जा.क्र.राआसो/मनुष्यबळ/वयोमर्यादा-शुध्दीपत्रक/ 9896-9979 /१९
दि २८/०५/२०१९

**विषयः राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सर्व स्तरावर भरण्यात येणाऱ्या पदांच्या वयोमर्यादेबाबत.**

संदर्भ: १.या कार्यालयाचे पत्र जा.क्र.राआसो / मनुष्यबळ / वयोमर्यादा / ६१९०९-६२२२४/१८,दि.२९/०९/२०१८
२.दि.२८ मार्च,२०१९ च्या कार्यकारी समिती बैठकीतील निर्णय.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र.१ अन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणाऱ्या पदांच्या वयोमर्यादेबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकातील मुद्दा क्रमांक १ व २ मध्ये संदर्भ क्र.२ अन्वये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

"राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत वैदयकीय अधिकारी (MBBS), विशेषतज्ञ, अतिविशेषतज्ञ व अभियानातील इतर रुग्ण सेवेशी संबंधित पदांसाठी (उदा.परिचारीका, अधिपरिचारीका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माता इ.) सेवा प्रवेश आणि सेवा समाप्तीची वयोमर्यादा खालील प्रमाणे राहील.

१. एमबीबीएस,विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष राहील.

२. रुग्ण सेवेशी संबंधित इतर पदांची वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.

वय वर्ष ६० नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडून शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतरच पुर्ननियुक्ती आदेश देण्यात यावेत.

सदर शुध्दीपत्रक निर्गमित केलेल्या दिनांकापासून लागू राहील.

(डॉ.अनूप कुमार यादव)
आयुक्त आरोग्य सेवा तथा संचालक
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

प्रति,

१. आयुक्त महानगरपालीका (सर्व)
२. व्यवस्थापकीय संचालक (सिडको), नवी मुंबई
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. संचालक (२) (कु.क.) आरोग्य सेवा, राज्य कुंटूब कल्याण कार्यालय,पुणे

कृ. मा. ५

ScannedbyCamScanner

५. मुख्याधिकारी नगरपालीका (एनयुएचएम अतंर्गत)
६. मुख्याधिकारी कटकमंडळे (एनयुएचएम अतंर्गत), देवलाळी,पूणे, खडकी, देहूरोड.
७. सहसंचालक कुष्ठरोग व क्षयरोग, पुणे
८. सहसंचालक (असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
९. सहसंचालक हिवताप व हत्तीरोग, जलजन्यरोग,पुणे
१०उपसंचालक (आईसी), पुणे
११ उपसंचालक (तंबाखू नियंत्रण कार्यक्रम) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
१२ उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व)
१३ कार्यकारी संचालक , राज्य आरोग्य संसाधन यंत्रणा, पूणे
१४ जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परीषद (सर्व)
१५ जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, (सर्व)
१६ प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर
१७ प्राचार्य, आरोग्य व कुंटुब कल्याण प्रशिक्षण संस्था (सर्व)

**प्रत:**

१. परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, उपसंचालक आरोग्य सेवा, (सर्व)
२. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा परीषद (सर्व)
३. जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा परीषद (सर्व)
४. शहर कार्यक्रम व्यवस्थापक, महानगरपालीका (सर्व)
५. शहर लेखा व्यवस्थापक, महानगरपालीका (सर्व)

**प्रत माहितीस्तव:**

१. संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
३. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
४. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५. अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
६. सहाय्यक संचालक (आयुष), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
७. सहाय्यक संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
८. सहाय्यक संचालक (रक्तकक्ष), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
९. राज्य कार्यक्रम व्यवस्थापक (एनएचएम व एनयुएचएम), मुंबई

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:**

- मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

**निरोगी गाव, निरोगी देश**



ScannedbyCamScanner

Annexure I- 4

P/141

आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी - ०२२ - २२७१७५००
फॅक्स - ०२२ - २२६४२२५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४०० ००१

पदभरती विशेष मोहीम
कालमर्यादा

जा.क्र.राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/पदभरती/ १०६७०-११०१६ /२०२३
दिनांक- २७/०४/२०२३

प्रति,

१. जिल्हाधिकारी (सर्व)
२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. संचालक राज्य आरोग्य व प्रशिक्षण,संस्था नागपूर
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे, (सर्व)
६. प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व)
७. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय, (सर्व)
९. वैद्यकीय आरोग्य अधिकारी,महानगरपालिका (सर्व)
१०. वैद्यकीय अधिक्षक,कामा हॉस्पिटल , मुंबई

**विषय**- राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विभागीयस्तरावर, जिल्हास्तरावर व तालुकास्तरावरील पदे विशेष मोहीम राबवून भरणेबाबत...

**संदर्भ**-१) या कार्यालयाचे पत्र क्र.राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष /पदभरती/११९९४६-१२०२०८/२०२२ दिनांक- २०.०९.२०२२

२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.राआसो/मनुष्यबळ कक्ष/पदभरती समिती/१६५४५०-७४६/२०२२ दिनांक- २४.११.२०२२

३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.राआसो/मनुष्यबळ कक्ष/पदभरती/५६४-८४६/२०२२ /ना.शि.का. दिनांक- २७.१२.२०२२

४) मा.मंत्री महोदय,सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय,मुंबई यांचे निर्देश.

५) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.राआसो/मनुष्यबळ कक्ष/सुधारित पदभरती समिती/१०२६६-१०६००/२०२३ दिनांक- २६.०४.२०२३

उपरोक्त संदर्भ क्र.१ ते ३ अन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार सन २०२२-२३ मधील मंजुर पदांपैकी रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्याकरीता या कार्यालयाच्या स्तरावरून वारंवार सुचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु ब-याच संस्था/कार्यालयस्तरावर सदर पदभरतीमधील विलंबामुळे पदे भरली जात नसून पर्यायाने आवश्यक रुग्णसेवा देण्यामध्ये अडचणी निर्माण होतात.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.४ वरील मा.मंत्री महोदयांनी महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विशेष पदभरती मोहीम राबविण्याबाबत सुचना/निर्देश दिलेले आहेत. सदर पदभरती पुर्ण करण्याच्या दृष्टीने राज्यस्तरावरून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना व मनुष्यबळ सुसूत्रिकरणाच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करण्यात यावा. सदर पदभरती साठी खालीलप्रमाणे नियोजन करण्यात यावे.

१) ज्या पदांकरीता जाहिरात देऊन अर्ज प्राप्त झाले आहेत किंवा प्राप्त अर्जांची छाननी प्रक्रिया पुर्ण झालेली आहे अशा प्रकरणी पदभरतीची पुढील कार्यवाही तात्काळ पुर्ण करण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

२) तसेच संदर्भ क्र.१ च्या पत्रानुसार पदभरती करताना निवड सुचीनुसार निवड झालेले उमेदवार उपलब्ध नसल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात यावेत. त्यानुसार ज्या रिक्त पदांसाठी प्रतिक्षा यादी वैध आहे अशा ठिकाणी प्रतिक्षा यादीतूनच बिंदूनामावली नुसार नियुक्ती आदेश देण्यात यावेत. या करिता नव्याने जाहिरात देण्याची गरज नाही.

३) उपरोक्त प्रमाणे प्रलंबित पदभरती प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करावी.

४) वरीलप्रमाणे पदभरती प्रक्रिया पूर्ण झाल्यावर जिल्हा स्तरावरील रिक्त असलेल्या पदांचा आढावा घेऊन आपल्या जिल्हयातील संवर्गनिहाय सर्व रिक्त पदे निश्चित करावीत. अशा सर्व पदांची मंजूर प्रकल्प अमंलबजावणी आराखडयानुसार मंजूर संख्या तसेच त्या संवर्गातील भरलेली पदे विचारात घेऊन एकत्रित सुधारित बिंदुनामावली बाबतच्या वेळोवेळी सुधारित शासन निर्णयानुसार व राज्यस्तरावरून निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार बिंदुनामावली तयार करून उपसंचालक स्तरावरून प्रमाणित करण्यात यावी.

५) बिंदूनामावली प्रमाणित करुन घेतल्यावर रिक्त पदांसाठी नव्याने जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी.

६) सदर पदभरती करताना पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या पदनिहाय प्रवर्ग निहाय गुणांकन करून यादी करण्यात यावी.

७) पात्र उमेदवारांमधून निवड प्रक्रिया खालील प्रमाणे राबविण्यात यावी.

१) **थेट मुलाखती:-** अतिविशेषतज्ञ, विशेषतज्ञ, वैद्यकीय अधिकारी (MBBS) हि पदे **थेट मुलाखती** घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

१) Subject Knowledge (१०)

२) "Research & Academic Knowledge(१०)"

३) Leadership Quality (१०)

४) Administrative Abilities (१०)

५) Experience (१०)

a) For Govt. Experience-२ marks for one year

b) For Private Experience-१ marks for one year

Total Experience-१० marks Maximum.

**एकूण गुण-५०**

२) **गुणांकन पद्धती-** उपरोक्त थेट मुलाखतीमधील पदांव्यतिरिक्त इतर सर्व पदांकरिता गुणांकन पद्धतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबवावी.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० % प्रमाणे proportion = ६० * ५० / १०० = ३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण | २० गुण |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| असल्यास विचारात घ्यावी) | करून अतिरिक्त B.Sc (Nursig) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursig) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २० % प्रमाणे proportion = ६० * २० / १०० = १२ गुण) | |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत.( १ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकूण १०० गुण |

अ) सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात यावी. त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात यावेत.

आ) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे. तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे.

इ) ज्या पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे त्या पदांकरीता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापूर्वी त्याची उपसंचालक स्तरावर/जिल्हास्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात यावी.

**ई) गुणांकन पद्धतीनुसार भरण्यात येणा-या पदांकरिता कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येऊ नये,याची नोंद घ्यावी.**

८) वरील दोन्ही पद्धतीनुसार नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांना रुजू करून घेण्यापूर्वी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे आणि इतर आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची राहील.

९) पदभरतीच्या अनुषंगाने उमेदवारांशी संबंधित सर्व सूचना इत्यादी वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.

१०) पदभरतीबाबत यापूर्वी दिलेल्या सर्व सुचनांचे पालन करावे जसे, बिंदूनामावली, कंत्राटी नियुक्ती कालावधी, मानधन इत्यादी.

११) एकूण पदांच्या ५०% प्रतिक्षा यादी ठेवावी.

१२) ज्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिद्ध केली जाते, त्याच संकेत स्थळावर पदभरती बाबतची सर्व माहिती अद्यावत करावी, जेणेकरून उमेदवारांची गैरसोय होणार नाही.तसेच संबधितांनी आपल्या कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक बंद असल्यास सुरू करावे. जेणेकरून उमेदवारांना अपेक्षित सर्व माहिती पुरविणे सोईचे होईल.

१३) पदभरतीची सद्यस्थिती संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावी जेणेकरून उमेदवारांना त्याकरिता संपर्क करण्याची आवश्यकता भासणार नाही.

१४) सदरच्या पदभरती प्रक्रियेस कालमर्यादा असल्याकारणाने विशेष मोहीम राबवून खालील वेळापत्रका प्रमाणे नियोजन करण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner

## पदभरतीचे नियोजन

| अ.क्रं. | तपशील | कालमर्यादा (मे २०२३ -जुलै २०२३) |
|---|---|---|
| १ | उपसंचालकस्तरावरुन बिंदूनामावली प्रमाणित करुन घेणे | दि.०८/०५/२०२३ ते दि.१५/०५/२०२३ |
| २ | उपसंचालकस्तरावरुन/जिल्हास्तरावरुन जाहिरात प्रसिध्द करणे . | दि.२२/०५/२०२३ ते दि.०२/०६/२०२३ (अंतिम दिनांक) |
| ३ | उमेदवारांकडून प्राप्त ऑनलाईन अर्जानुसार त्यांचे गुणांकन करून पात्र /अपात्र उमेदवारांची यादी तयार करणे व संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे | दि.०५/०६/२०२३ ते दि.१५/०६/२०२३ |
| ४ | पात्र/अपात्र उमेदवारांच्या यादीवर हरकती मागवून त्यांचे निराकरण करणे. | दि.२०/०६/२०२३ |
| ५ | अंतिम निवड यादी प्रसिद्ध करणे. | दि. २७/०६/२०२३ |
| ६ | निवड यादी प्रसिद्ध केल्यानंतर निवड झालेल्या उमेदवारांचे मूळ कागदपत्र पडताळणी करून नियुक्ती आदेश निर्गमीत करणे. | दि. २८/०६/२०२३ ते दि ०७/०७/२०२३ |
| ७ | १. नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची प्रक्रिया संपल्यानंतर दोन दिवसात पदभरतीचा सविस्तर अहवाल राज्य कार्यालयास सादर करणे.<br>२. निवड झालेल्या उमेदवारांचा रुजू अहवाल दरमहा राज्यस्तरावर सादर करणे. | दि १०/०७/२०२३ |

धीरज कुमार (भा.प्र.से)
आयुक्त,आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान,महाराष्ट्र मुंबई.

प्रत कार्यवाहीस्तव,

- परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, परिमंडळे,सर्व
- जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा परिषद,सर्व
- जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा परिषद,सर्व
- शहर कार्यक्रम व्यवस्थापक,महानगरपालिका,सर्व
- शहर लेखा व्यवस्थापक, महानगरपालिका,सर्व

प्रत महितीस्तव,

- मा. प्रधान सचिव ,सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
- संचालक, आरोग्य सेवा १/२ (मुंबई/पुणे)
- सहसंचालक (तांत्रिक),राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई
- सहसंचालक (अतांत्रिक),राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
- कार्यक्रम प्रमुख,सर्व (मुंबई/पुणे)
- स्वीय सहाय्यक, मा. मंत्री सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
- कार्यालयीन अधीक्षक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र मुंबई.



Scanned with OKEN Scanner

Annexure I- 5

आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी - ०२२ - २२७१७५००
फॅक्स - ०२२ - २२६४२५,५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४०० ००१

परिपत्रक

जा.क्र.राआसो/मनुष्यबळ/ ११०८३७-१११९५४ /२०२२

दिनांक - 03/09/2022

विषय - राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना अनुज्ञेय असणारे विशेष वेतनाबाबत.

संदर्भ - १) क्र.राआसो/आस्था/विवे व निवासस्थान/ ५०९४३-५११७३/२०१६ दिनांक-१६/०९/२०१६ रोजीची मान्य टिपणी

२) दि २३ ऑगस्ट २०२१ रोजी झालेल्या राज्य आरोग्य सोसायटी मुंबई, कार्यकारी समितीची ३२ व्या बैठकीचे इतिवृत्त

संदर्भ क्र १ अन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना स्वत: च्या पदाव्यतिरिक्त दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविल्यास अतिरिक्त कार्यभार सोपविलेल्या पदाच्या दरमहा संभाव्य मानधनाच्या ५ टक्के दराने परंतू दरमहा रु. ७५०/- एवढया मर्यादेपर्यत अतिरिक्त वेतन / विशेष मानधन अनुज्ञेय करण्यात आले होते. आता यामध्ये बदल करुन अतिरिक्त कार्यभार असणा-या कंत्राटी कर्मचारी यांच्या अतिरिक्त वेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव ३२ व्या कार्यकारी समितीपुढे ठेवून त्यास समितीची मान्यता घेण्यात आली आहे.

त्यानुसार या आदेशाच्या दिनांकापासुन अतिरिक्त कार्यभार मानधन पुढील प्रमाणे देय राहील.

| अ.क्र | वेतन सुसुत्रीकरणानुसार पदाचे वेतन | अतिरिक्त वेतन सुधारित दर |
|---|---|---|
| १. | १५५८० ते २४९९९ | रु.१०००/- दरमहा |
| २. | २५००० ते पासून पुढे | रु.१५००/- दरमहा |

टिप -१) अतिरिक्त वेतन हे कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाकरीता वेतन सुसुत्रीकरणांतर्गत मंजुर प्रारंभिक वेतनावर अदा करण्यात यावे.

२) एखादया कर्मचा-यांकडे एकापेक्षा जास्त अतिरिक्त कार्यभार असला तरी, सदरचे विशेष वेतन हे एकाच अतिरिक्त कार्यभाराच्या मर्यादीत असेल.

सदरचा विशेष मानधनाचा खर्च अतिरिक्त कार्यभार सांभाळणारा अधिकारी/ कर्मचारी हा सदयस्थितीत घेत असलेल्या मानधनाच्या लेखाशिर्षका अंतर्गत खर्ची टाकावा.

(संजय सरवदे) 3/1/22
सहसंचालक (अतांत्रिक)
राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई

Scanned by CamScanner

Annexure I- 6

आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ 90091-१९६

परिपत्रक

क्र.राआसो/आस्था/प्रसुती रजा/ /१८
दि.२३/०४/२०१८

विषय :- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी स्त्री कर्मचाऱ्यांच्या प्रसुती रजेबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि.२४/१२/२०१३ रोजीचे परिपत्रक.

या कार्यालयाच्या उक्त संदर्भिय परिपत्रकानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी स्त्री कर्मचाऱ्यांना दोन बाळंतपणापर्यंत ९० दिवस पुर्ण मानधन प्रसुती रजा अनुज्ञेय होती. या परिपत्रकानुसार प्रसुती रजेच्या लाभामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत स्त्री कर्मचाऱ्यांना दोन बाळंतपणापर्यंत (दोन मुले जिवंत) १८० दिवस पुर्ण पगारी रजा खालील अटीनुसार अनुज्ञेय राहील.

१) प्रसुती रजा मंजूर करण्यापूर्वी ६ महिन्यांच्या वेतनाइतक्या रकमेचा बॉन्ड स्त्री कर्मचाऱ्यांकडून घेण्यात यावा, तद्नंतरच उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे प्रसुती रजा व रजा वेतन अनुज्ञेय करण्यात यावे.

२) स्त्री कर्मचाऱ्यांनी प्रसुती रजा उपभोगून कामावर रुजु झाल्यानंतर किमान दोन वर्ष राष्ट्रीय आरोग्य अभियानाची सेवा करणे बंधनकारक राहील. (सेवाखंडाचा कालावधी वगळून उर्वरीत प्रत्यक्ष सेवेचा कालावधी केवळ या प्रयोजनासाठी ग्राहय धरावा) सेवेचा उक्त नमुद कालावधी पूर्ण होण्यापूर्वी, प्रसुती रजा कालावधीत/प्रसुती रजेनंतर रुजु न होता/प्रसुती रजा संपवून रुजु झाल्यावर, राजीनामा दयावयाचा झाल्यास अथवा अन्य कारणास्तव राजीनामा दयावयाचा झाल्यास अशा कंत्राटी स्त्री कर्मचाऱ्याने घेतलेल्या प्रसुती रजा कालावधीत देय झालेल्या वेतनाइतके वेतन अदा केल्यानंतरच स्त्री कर्मचाऱ्यांस राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेचा राजीनामा देता येईल.

३) उपरोक्त सुचना या परिपत्रकाच्या दिनांकापासून लागू होतील.

सदर परिपत्रकानुसार सुचना या केंद्रशासनाच्या मार्गदर्शनाच्या व राज्य कार्यकारी समितीच्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(श्रीमती दिप्ती पाटील)
सहसंचालक (अतांत्रिक)
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

प्रति,

१) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
२) व्यवस्थापकिय संचालक, सिडको, नवी मुंबई.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

कृ.मा.प.

४) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कु.क.), पुणे.
५) सहसंचालक, आरोग्य सेवा (राअंनिका/असंसर्गजन्य रोग), मुंबई
६) सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे
७) सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे
८) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व परिमंडळ)
९) उपसंचालक, आरोग्य सेवा (आ.मा.जि.आ.), पुणे
१०) प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर
११) उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रुषा), मुंबई.
१२) अधिष्ठाता, शासकिय वैदयकिय महाविदयालय व रुग्णालय (संबंधित)
१३) प्राचार्य, आरोग्य व कुटंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व)
१४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१५) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, (सर्व)
१६) सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (एकात्मिक साथरोग सर्वेक्षण प्रकल्प, पुणे)
१७) मुख्याधिकारी, देवळाली, पुणे, खडकी व देहू रोड कटकमंडळे
१८) मुख्याधिकारी, एनयूएचएम अंतर्गत सर्व नगरपालिका
१९) कार्यकारी संचालक, राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे.
२०) परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, आरोग्य सेवा, सर्व परिमंडळ
२१) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जि. प. (सर्व)
२२) जिल्हा लेखा व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद (सर्व)
२३) शहर कार्यक्रम व्यवस्थाक, महानगरपालिका (सर्व)
२४) शहर लेखा व्यवस्थापक, महानगरपालिका (सर्व)
२५) राज्यस्तरीय सर्व अधिकारी/कर्मचारी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

प्रत माहितीस्तव:-

२६) अतिरिक्त संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
२७) संचालक (वित्त व लेखा) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२८) सहसंचालक (तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२९) अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३०) सहायक संचालक (एनयूएचएम), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३१) सहायक संचालक (आयुष), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३२) राज्य कार्यक्रम व्यवस्थापक (एनएचएम/एनयूएचएम), राआसो, मुंबई

**प्रत माहितीस्तव सादर** - मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

Annexure I-7

असा. क्र. १०९ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, डिसेंबर ३१, २००५/ पौष १०, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ डिसेंबर २००५

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक अरजा. २४०५/प्र.क्र. १६/सेवा-८.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ यांच्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहे :—

१. (*i*) या नियमांना, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) (सुधारणा) नियम, २००५ असे म्हणता येईल.

(*ii*) हे नियम दिनांक १ जानेवारी २००६ पासून अंमलात येतील.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील परिशिष्ट तीनमध्ये, नियम ३ नंतर, पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" नियम ३अ. **अर्जित रजेची गणना.**



[ **किंमत** : रुपये ७.०० ]

(अ) क्षयरोग/कर्करोग/कुष्ठरोग/पक्षघात झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या परिशिष्ट तीन मधील विद्यमान तरतुदीप्रमाणेच कमाल एक वर्षाच्या मर्यादेपर्यंत सलग पूर्ण वेतनी ' विशेष रजा ' मंजूर करण्यात आल्यावर, पुढील अर्ध्या वर्षाच्या सुरुवातीस त्यांच्या खाती जमा करावयाची अर्जित रजा अशा विशेष रजेच्या कालावधीच्या १/१० परंतु कमाल १५ दिवसांपर्यंत इतकी कमी करण्यात येईल.

(ब) अर्जित रजा जमाखाती टाकताना, रजेच्या अपूर्ण दिवसाचे रुपांतर नजीकच्या पूर्ण दिवसामध्ये करण्यात येईल.''.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नसीमा म. शेख,**
शासनाच्या उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th December 2005

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. LVE. 2405/CR-16/SER-8.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Leave) Rules, 1981, as follows :—

1. (*i*) These rules may be called the Maharashtra Civil Services (Leave) (Amendment) Rules, 2005.

(*ii*) These rules will come into force with effect from 1st January 2006.

2. In the Maharashtra Civil Services (Leave) Rules, 1981, in APPENDIX III, after Rule 3, the following rule shall be inserted, namely :—

" Rule 3A *Calculation of Earned Leave :—*

(*a*) In case Government servant is affected by Tuberculosis (T.B.)/ Cancer/Leprosy/Paralysis and special leave is granted to him on full pay and the leave salary for such leave is regulated under normal rules then the credit to be afforded to his leave account at the commencement of the next half year shall be reduced by 1/10th of the period of such leave subject to a maximum of 15 days ;

(*b*) While affording credit of earned leave, fraction of a day shall be rounded off to the nearest day.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NASIMA M. SHAIKH,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती)

महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर (८० प्रती)

महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई (४० प्रती),

महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर (४० प्रती),

महालेखापाल (वाणिज्य लेखापरीक्षा), मुंबई,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती),

संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),

*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, महाराष्ट्र राज्य, उच्च न्यायालय, मुंबई,

* प्रबंधक, अपील शाखा, महाराष्ट्र राज्य, उच्च न्यायालय, मुंबई,

*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

मुख्य लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई,

मुख्य मंत्र्यांचे सचिव,

मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

राज्यपालांचे सचिव,

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व मंत्रालयीन विभाग,

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांच्या अधिकाराखाली असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,

विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली,

वित्त विभागातील सर्व कार्यासने, (ग्रंथपाल ५ प्रती),

निवड नस्ती-कार्यासन सेवा-८, वित्त विभाग.

* पत्राने.

Annexure I- 8


# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१


6483-800

**परिपत्रक**

क्र.राआसो/आस्था/ **क्षयरोग** रजा/ /२०२०
दि. 23/१०/२०२०

**विषय :– राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कर्मचारी यांना क्षयरोग रजा लागू करणेबाबत.**

संदर्भ:– मा.आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची दि.१०/१०/२०२० रोजीची मान्य टिपणी.

राज्य शासनाच्या महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील परिशिष्ट तीन (नियम ७९) अन्वये राज्य शासनाच्या नियमित आस्थापनेवरील सर्व शासकीय कर्मचा–यांना क्षयरोग रजा मंजुर केलेली असून किमान तीन वर्षाची सतत सेवा झालेल्या अस्थायी शासकीय कर्मचा–यांनाही क्षयरोग रजा मंजुर करण्यात येते. या धर्तीवर क्षयरोग रजा राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचा–यानांही लागू करण्याची बाब या कार्यालयाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत सलग तीन ११ महिन्यांचे करार पूर्ण केलेल्या (सेवाखंड वगळून) कंत्राटी कर्मचा–यांना अधिकतम एक वर्षाकरीता क्षयरोग रजा सक्षम वैद्यकिय अधिका–याने/ मंडळाने दिलेल्या वैद्यकिय प्रमाणपत्राच्या आधारे मंजुर करण्यात यावी.

२) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा–यांच्या रजा लेख्यामध्ये शिल्लक असलेली सर्व प्रकारची रजा (८ किरकोळ व ७ वैदयकिय रजा) मंजुर केल्यानंतर कर्मचा–यास वैद्यकिय अहवालानुसार व शिफारशीनुसार उपरोक्त १ मधील क्षयरोग रजा मंजुर करण्यात यावी .

23/10/2020

**(डॉ. सतीश पवार)**
**अतिरिक्त अभियान संचालक,**
**राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई.**

प्रति,

१) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
२) व्यवस्थापकिय संचालक, सिडको, नवी मुंबई.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४) संचालक (२), आरोग्य सेवा (कु.क.), पुणे.
५) अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
६) संचालक (वित्त व लेखा) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
७) सहसंचालक (तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

८) अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
९) सहसंचालक, आरोग्य सेवा (राअंनिका/असंसर्गजन्य रोग), मुंबई
१०) सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे
११) सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे
१२) उपसंचालक, आरोग्य सेवा (मौखिक आरोग्य), मुंबई
१३) उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रुषा), मुंबई.
१४) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व परिमंडळ)
१५) उपसंचालक, आरोग्य सेवा (आ.मा.जि.आ.), पुणे
१६) सहायक संचालक (एनयूएचएम), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
१७) सहायक संचालक (आयुष), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
१८) प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर
१९) अधिष्ठाता, शासकिय वैदयकिय महाविदयालय व रुग्णालय (संबंधित)
२०) प्राचार्य, आरोग्य व कुटंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व)
२१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२२) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, (सर्व)
२३) सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (एकात्मिक साथरोग सर्वेक्षण प्रकल्प, पुणे)
२४) मुख्याधिकारी, देवळाली, पुणे, खडकी व देहू रोड कटकमंडळे
२५) मुख्याधिकारी, एनयूएचएम अंतर्गत सर्व नगरपालिका
२६) कार्यकारी संचालक, राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे.
२७) राज्य कार्यक्रम व्यवस्थापक (एनएचएम/एनयूएचएम), राआसो, मुंबई
२८) मनुष्यबळ सल्लागार, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२९) राज्य वित्त व्यवस्थापक (एनएचएम/एनयूएचएम), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३०) परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, आरोग्य सेवा (सर्व परिमडळ)
३१) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यालय (सर्व)
३२) जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यालय (सर्व)
३३) शहर कार्यक्रम व्यवस्थापक, महानगरपालिका (सर्व)
३४) शहर लेखा व्यवस्थापक, महानगरपालिका (सर्व)

प्रत माहितीस्तव सादर- मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

Annexure I- 9

P/153


**आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान**
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

| | |
|---|---|
| दुरध्वनी - ०२२ - २२७१७५०० <br> फॅक्स - ०२२ - २२६४२९५५ <br> E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | आरोग्य भवन, ३रा मजला, <br> सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, <br> सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |


परिपत्रक

जा.क्र.राआसो/मनुष्यबळ/कं.कर्म/अनुभव बोनस/ २८९४८-५२८ /२०२३
दिनांक - ०१/०६/२०२३

**विषय -** राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी /कर्मचारी यांच्या अनुभव बोनस बाबत मार्गदर्शक सुचना

**संदर्भ -**
१. केंद्र शासनामार्फत सन २०२२-२३ करिता मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा
२. या कार्यालयाचे जा.क्र. राआसो/मनुष्यबळ/लॉयल्टी/११३४६९-११८३६२ दि.१२ मार्च २०१८ रोजीचे पत्र.
३. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची दि. दि.०१.०६.२०२३ रोजीची मान्य टिपणी

**प्रस्तावना-**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत दरवर्षी सदरील आर्थिक वर्षाचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात येतो व तद्नंतर केंद्र शासनाच्या मंजूरीने या कार्यालयास प्राप्त होतो. त्यानुसार अभियानांतर्गत कार्यरत राज्यभरातील ज्या कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांची ३ वर्ष व ५ वर्ष सलग सेवा पूर्ण झालेली आहे त्यांना अनुभव बोनस लागू करण्यात येतो. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा केंद्र शासनाकडून मंजुर होऊन या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात देखील सर्व पात्र कंत्राटी अधिकारी/कर्मचा-यांना अनुभव बोनस देय करण्याबाबतची बाब विचाराधीन होती. त्याअनुषंगाने अनुभव बोनस (Loyalty Bonus) संदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**निर्णय :-**

**अनुभव (लॉयल्टी) बोनस :-**

ज्या अधिका-यांची/ कर्मचा-यांची अभियानांतर्गत ३१ मार्च २०२२ रोजी सलग ३ वर्ष व ५ वर्ष सेवा पूर्ण झाली असेल अशा अधिकारी/ कर्मचारी यांना या कार्यालयाच्या दि.१२/०३/२०१८ च्या पत्रामध्ये नमूद सुचनांचा अवलंब करुन पुढीलप्रमाणे लॉयल्टी बोनस मंजूर करावा.

१) ज्या अधिकारी/कर्मचारी यांची ३१ मार्च २०२२ रोजी सलग ३ वर्ष सेवा पूर्ण झाली आहे, त्यांना **३१ मार्च २०२२** रोजीच्या देय मानधनावर १०% लॉयल्टी बोनस मंजूर करुन १ एप्रिल २०२२ पासून देय राहील.

२) ज्या अधिकारी/ कर्मचा-यांची सलग ३ वर्ष सेवा पूर्ण झाल्यावर १०% लॉयल्टी बोनस मंजूर करण्यात आला असून त्या अधिकारी/कर्मचा-यांची सलग ५ वर्ष पूर्ण सेवा झाली आहे त्यांना उर्वरीत ५% लॉयल्टी बोनस **३१ मार्च २०२२** रोजीच्या देय मानधनावर मंजूर करून १ एप्रिल २०२२ पासून देय राहील.

३) ज्या कर्मचा-यांची ३ वर्ष पेक्षा जास्त पण ५ वर्ष पेक्षा कमी सेवा पूर्ण होत आहे व ज्या अधिकारी/कर्मचा-यांना अद्यापपर्यंत अनुभव बोनस चा लाभ मिळालेला नाही अशा कर्मचा-यांना १०% लॉयल्टी बोनस मंजूर करावा.

४) कोणत्याही परिस्थितीत एका कर्मचा-यास त्याच्या एक पुनर्नियुक्ती कालावधी मध्ये १५ % पेक्षा जास्त वार्षिक मानधन वाढ व लॉयल्टी बोनस मंजूर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५) लॉयल्टी बोनस हा सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता त्या वर्षाच्या ३१ मार्च २०२२ रोजीच्या देय मानधनावर परिगणीत करुन त्या वर्षाच्या १ एप्रिल २०२२ पासून अनुज्ञेय करावा.

(कृ.मा.प.)...१/३

६) ५ वर्ष/३ वर्ष परिगणना करताना सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या ३१ मार्च २०२२ पूर्वी मागील ३/५ वर्षाची सलग सेवा (तांत्रिक खंड वगळून) हिशेबात घ्यावीत.

७) कोणत्याही परिस्थीतीत ३१ मार्च २०२२ पूर्वी किंवा त्यानंतर ३/५ वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचा-यास १५ % पेक्षा जास्त लॉयल्टी बोनस व एकापेक्षा अधिक वेळा मंजूर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८) यापूर्वी अभियानातील ३/५ वर्षे कंत्राटी सेवा पूर्ण झालेल्या ज्या कर्मचा-यांनी लॉयल्टी बोनसचा लाभ घेतलेला आहे त्या कर्मचा-यांना यानुसार पुन्हा लॉयल्टी बोनसचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

मानधनवाढ/पुढील कंत्राट देण्यापुर्वी सदरील पद वार्षिक प्रकल्प अंमलबजावणी आराखडयामध्ये मंजूर असल्याची खात्री करावी. राज्यस्तरावरुन नियुक्ती/ पुनर्नियुक्ती दिले जाणारे परिमंडळ/जिल्हा/महानगरपालिका व इतर संबंधित स्तरावर कार्यरत अधिकारी त्यांच्या नियुक्ती / पुनर्नियुक्ती आदेशात नमूद मानधनापेक्षा अधिकचे मानधन घेत असल्याचे आढळून आल्यास संबंधित परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक/ जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक/ जिल्हा लेखा व्यवस्थापक/शहर कार्यक्रम व्यवस्थापक/ शहर लेखा व्यवस्थापक यांना जबाबदार धरण्यात येईल व सदर रकमेची वसुली त्यांच्या मानधनातून करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तरी उपरोक्त प्रमाणे मार्गदर्शक सुचनांच्या अधीन राहून दिनांक १ एप्रिल २०२२ पासून अनुभव बोनसची अदायगी संबंधित स्तरावरून करण्यात यावी.

(सुभाष बोरकर)
सहसंचालक (अतांत्रिक)
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

**प्रति,**

१) राज्य कार्यक्रम व्यवस्थापक (एनएचएम/ एनयूएचएम), राआसो, मुंबई
२) राज्य वित्त व्यवस्थापक (एनएचएम/एनयूएचएम), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
